# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.04.2025** **वारःमंगळवार**

---

1 ) भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसारच गेले 11 वर्ष केंद्रसरकारची वाटचाल – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच प्रतिपादन

2 ) विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयानं निवडलेल्या क्यु-एन-यू लॅब्ज या स्टार्टअपच्या क्यु-शिल्ड मंचाचं उद्घाटन

3 ) अमेरिका आणि इराण यांच्यात तेहरान अणू प्रकल्पाबाबत चर्चेची दुसरी फेरी शनिवारी होण्याची शक्यता आणि

4 ) आयपीएल क्रिकेट स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज संघाचा लखनऊ सुपर जायंट्सवर विजय

**<u>पंतप्रधान</u>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आमच्या सरकारला मार्गदर्शनपर ठरत असून त्यांच्या आदर्शांनुसारच हे सरकार गेल्या ११ वर्षांपासून काम करत आहे अस प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल. ते काल हरियाणामधील हिस्सार इथं आयोजित सभेत बोलत होते.

वक्फ कायद्यात बदल केल्याचा फायदा गरीब मुस्लिमांना होणार आहे. तसंच आदिवासींच्या जमिनींचंही यामुळे संरक्षण होणार आहे. वक्फ कायद्यात बदल झाल्यानंतर अनेक मुस्लिम विधवा महिलांनी सरकारला पत्र पाठवून आभार मानल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी काल हिसार विमानतळाच्या टर्मिनल दोनची पायाभरणी केली. तसंच त्यांच्या हस्ते अयोध्येसाठी व्यावसायिक विमानाच्या उड्डाणाचा प्रारंभ झाला. विमानतळाच्या या नवीन टर्मिनल्सच्या उभारणीसाठी ४१० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून अत्याधुनिक सुविधा इथं देण्यात येणार आहे.

**<u>क्युएनयू</u>**

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयानं निवडलेल्या क्यु-एन-यू लॅब्ज या स्टार्टअपनं विकसित केलेल्या क्यु-शिल्ड या जगातल्या पहिल्या मंचाचं उद्घाटन कालच्या जागतिक क्वांटम दिनाच्या औचित्यानं करण्यात आलं. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय क्वांटम मिशन अंतर्गत हा उपक्रम सुरू करण्यात आला. क्वांटम

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक पातळीवर नेतृत्व करण्याच्या दिशेनं भारताचे प्रयत्न सुरू आहेत; त्या दृष्टीनं हे महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. संबंधित कंपन्या, व्यवसाय किंवा उद्योगांच्या महत्त्वपूर्ण पायाभूत संरचना सुरक्षित ठेवण्यासाठी क्यु-शिल्ड उपयुक्त ठरणार आहे.

**पंकजचौधरी**

देशाला 2047पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ध्येय असून विकसित भारताच्या जडणघडणीत महसूल सेवेची भूमिका महत्त्वाची असेल असं प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी केलं. नागपुरातील प्रत्यक्ष कर अकादमी एन ए डी टी इथं 77 व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ आणि सेवापूर्व प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी ते काल बोलत होते . रॉयल भूतान सेवेच्या 2 अधिकाऱ्यांसह 84 आय आर एस अधिकारी प्रशिक्षणार्थींनी 16 महिन्यांचे सेवा पूर्व प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर कर प्रशासकाची शपथ घेतली. देशातील एकूण कर संकलनात 50 टक्के वाटा प्रत्यक्ष कराचा असून, गेल्या आर्थिक वर्षात 9 कोटी कर भरणा नागरिकांनी केला असल्याचं केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे सदस्य प्रबोध सेठ यांनी सांगितलं.

**गवई**

भारतीय राज्यघटना काळाच्या कसोटीवर खरी उतरली असून, तिने देशाला मजबूत, एकसंघ करत स्थैर्य दिलं आहे, असं मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण गवई यांनी काल नवी दिल्लीत व्यक्त केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काल डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या काही वर्षात देशानं अनेक बाह्य आक्रमणं आणि अंतर्गत कलहाचा सामना केला आहे, तरीही काळानुरुप बदल स्वीकारत घटनेत दुरुस्ती करण्यात आल्यानं तो एकसंघ आणि मजबूत आहे, असंही गवई म्हणाले.

**अमेरिका**

अमेरिका आणि इराण यांच्यातील तेहरान अणू प्रकल्पाबाबतच्या चर्चेची दुसरी फेरी शनिवारी रोममध्ये होण्याची शक्यता आहे. इटलीचे परराष्ट्र व्यवहारमंत्री अंटोनिओ ताजानी यानी ही बैठक रोममध्ये आयोजित करण्यास रोम तयार असल्याचं काल जाहीर केलं. ताजानी सध्या जपानच्या दौऱ्यावर असून, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. अमेरिका आणि इराण यांच्यातील अण्वस्त्राबाबतचा संघर्ष चर्चेनं सुटेल आणि शांतता प्रस्थापित होण्यास मदत मिळेल, असंही ते म्हणाले. या चर्चेसाठी ओमान मध्यस्थाची भूमिका बजावत असून, पहिली फेरी १२ एप्रिल रोजी ओमानमध्ये झाली होती. त्यावेळी दोन्ही देशांनी सकारात्मक आणि ठोस चर्चा झाल्याचं जाहीर केलं होतं. दरम्यान, इराणचे परराष्ट्र व्यवहारमंत्री अब्बास अराघाची याबाबत सल्ला मसलतीसाठी रशियाला जाणार असून, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्जी लावरोव्ह यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे.

**आग**

उत्तर प्रदेशात लखनौ इथल्या लोकबंधू रुग्णालयात काल रात्री उशिरा आग लागली, यामुळे रुग्णालय प्रशासनाने तत्काळ कारवाई करत 2 शे रुग्णांना तिथून बाहेर काढून दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आल. यामध्ये कोणतीही जीवित हानी झाल्याच वृत्त नाही तसच कोणीही जखमी झालेल नाही .उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी काल रात्री रुग्णालयाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली, तसच रुग्णालय प्रशासनाने प्रसंगावधान दाखवल्याबद्दल त्यांच कौतुक केल. प्राथमिक तपासात ही आग शॉर्ट सर्किट मुळे लागल्याच निष्पन्न झाल असून , उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनेची गंभीर दाखल घेत सखोल तपासाचे आदेश दिले आहेत .

**<u>हिमाचल प्रदेश</u>**

आज हिमाचल प्रदेश चा स्थापना दिवस आहे.15 एप्रिल 1948 रोजी हिमाचल मधील विविध 30 छोटी संस्थानिक राजघराण्यांचे प्रदेश एकत्र करून या राज्याची निर्मिती झाली. यावर्षी राज्य स्थापना दिवसाचा मुख्य शासकीय कार्यक्रम चंबा जिल्ह्यातील पांगी या पहाडी भागातील किल्लार या आदिवासी गावात होणार आहे.अशाप्रकारे डोंगराळ आदिवासी पांगी भागात होणारा हा पहिलाच मुख्य शासकीय कार्यक्रम असून त्याला मुख्यमंत्री सुखविनदर सुखू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यामुळे या भागातील स्थानिक आदिवासी गावातील नागरिकांमध्ये उत्साहाच वातावरण असून, यानिमित्त विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांच आयोजन करण्यात आल आहे.

**<u>पुरस्कार</u>**

केंद्रसरकारच्या वतीने देण्यात येणारे राष्ट्रीय महामार्ग सर्वोत्तम पुरस्कार आज नवी दिल्लीत प्रदान करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय महामार्ग बांधण्यात तसच त्याची कायम गुणवत्ता राखून देखभाल करताना उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यावसायिक संस्था आणि व्यक्तींना या पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे . तसच या निमित्ताने दिवसभर विविध चर्चासत्र आणि परिसंवाद आयोजित करण्यात आले असून, त्यात महामार्ग बांधणीत आलेले नवे तंत्रज्ञान, डोंगराळ भागात महामार्ग बांधण्याची आव्हाने तसच जागतिक स्तरावरील महामार्ग बांधणीची गुणवत्ता आणि भारतीय महामार्ग निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची क्षमता आदि विषयांचा यामध्ये समावेश आहे .

**<u>अंतराळ पथक</u>**

अमेरिकेची गायिका केटी पेरी हिच्यासह सहा महिलांचं एक पथक काल ब्लू ओरिजिन या रॉकेटच्या माध्यमातून पृथ्वीच्या वातावरणाच्या वरच्या थरात प्रवास करण्यासाठी रवाना झालं. या पथकात केटी पेरीसह टीव्ही प्रेझेंटर गेल किंग, चित्रपट निर्माते केरियन फ्लिन, माजी नासा एरोस्पेस अभियंता आयशा बोवे आणि लैंगिक हिंसाचाराच्या विरोधातल्या मोहीमेच्या संस्थापक अमांडा गुयेन यांचा समावेश आहे. १९६३ मध्ये रशियन अंतराळवीर व्हॅलेंटिना तेरेशकोवा यांच्या ऐतिहासिक एकट्या उड्डाणानंतर,काल सुरू झालेल्या या अंतराळ मोहिमेत, पहिल महिला अंतराळ पथक सहभागी झाल आहे.

**अमली पदार्थ**

अरबी समुद्राजवळ भारतीय सागरी सीमेजवळ गुजरात दहशतवाद विरोधी पथक आणि भारतीय  तटरक्षक दलाने  परवा पहाटे केलेल्या कारवाईत १ हजार ८०० कोटी रुपये किमतीचे ३०० किलो अमली पदार्थ जप्त केले. हा सर्व मुद्देमाल गुजरात एटीएसकडे सोपवण्यात आला असून एटीएस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी या कारवाईबाबत भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात पोलिसांचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान , महसूल  गुप्तचर संचालनालयानेही  मिझोराममधे ५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ५२ किलो अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी दोघा जणांना अटक करण्यात आली आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघानं लखनऊ सुपर जायंट्सवर पाच गडी राखून विजय मिळवला आणि आपली पाच सामन्यांतील पराभवाची मालिका खंडित केली.  प्रथम फलंदाजी करताना, लखनऊ संघानं निर्धारित २० षटकांत सात गडी गमावून १६६ धावा केल्या. त्याचा पाठलाग करताना कर्णधार महेंद्रसिंग धोनी आणि  शिवम दुबेच्या धमाकेदार खेळीमुळे चेन्नईनं १९ षटक आणि तीन चेंडूत १६७ धावांचं लक्ष्य गाठलं आणि सामना जिंकला. महेंद्रसिंग धोनीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

**धनुर्विद्या**

अमेरिकेत फ्लोरिडा इथं सुरू असलेल्या धनुर्विद्या विश्वचषक स्पर्धेत भारताच्या धीरज बोम्मदेवरानं कांस्य पदक पटकावलं आहे. पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व प्रकारात धीरजने आंद्रेस टेमिनो मेडिएलचा ६-४ असा पराभव केला. या स्पर्धेतलं धीरजचं हे दुसरे पदक आहे.

या विजयासह धनुर्विद्या स्पर्धेत एक सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्य अशा एकंदर चार पदकांसह भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर राहिला.

**हवामान**

आगामी  2 ते 3 दिवस राजस्थान आणि गुजरात मध्ये विविध  भागात  उष्णतेची तीव्र लाट राहण्याची शक्यता असून , पंजाब , हरियाणा आणि पश्चिम मध्यप्रदेशातही पुढील तीन दिवस अशीच तीव्र उष्णता जाणवण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे .

**याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल. नमस्कार**